स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतील राज्यशास्त्र विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी)
पदवीसाठी करावयाचा शोध प्रबंधाचा संक्षिप्त

संशोधन आराखडा

"परभणी जिल्ह्यातील मतदारांची उदासीनता : एक चिकित्सक अभ्यास"

*** संशोधक ***

पारडे राजु लिंबाजी

एम. ए . (राज्यशास्त्र) नेट

*** मार्गदर्शक ***

प्रा. डॉ. लोखंडे पी.एस.

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग

श्री. शिवाजी महाविद्यालय, परभणी

*** संशोधन केंद्र ***

पिपल्स महाविद्यालय, नांदेड

मार्च 2022

“परभणी जिल्ह्यातील मतदारांची उदासीनता : एक चिकित्सक अभ्यास”

प्रस्तावना :-

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाहीप्रधान देश आहे. आधुनिक काळात लोकशाही शासनपध्दती हा सर्वात उत्तम शासनप्रकार मानला जातो. ग्रीक नगरराज्यामध्ये प्राचीन काळामध्ये प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात होती. जगातील दोनतृतीयांशापेक्षा अधिक राष्ट्रांनी लोकशाही शासनव्यवस्थेचा स्विकार केला आहे.

“लोकशाही म्हणजे लोकांची सत्ता, लोकांनी चालविलेली प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सत्ता होय.”

ज्या राज्याची संपूर्ण सत्ता जनतेच्या हाती केंद्रित झालेली असते आणि जनता प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे त्या सत्तेचा वापर करत असते असे राज्य म्हणजे लोकशाही राज्य होय. प्राचीनकाळी ग्रीक नगरराज्यांमध्ये प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात असल्याने तेथील जनता राज्यकारभारामध्ये प्रत्यक्ष सहभाग होत असे. परंतु आधुनिक काळात वाढती लोकसंख्या लक्षात घेता. प्रत्यक्ष लोकशाही ऐवजी अप्रत्यक्ष लोकशाही अंमलात येऊन जनता आपले प्रतिनिधी निवडणुकीद्वारे निवडून देते आणि त्याच्या मार्फत राज्यकारभार चालवते. लोकांची संमती आणि लोकांची टिका या प्रक्रियेतून लोकशाहीचा कारभार चालतो.

<u>**लोकशाहीच्या व्याख्या.**</u>

1) <u>**अब्राहम लिंकन**</u> – “लोकशाही म्हणजे लोकांचे लोकांनी लोकांसाठी चालवलेले शासन होय”
2) <u>**लॉर्ड ब्राईस**</u> – “लोकशाही म्हणजे असा शासनप्रकार की ज्यात सत्ता एखाद्या विशिष्ट वर्गाच्या हाती नसते. तर संपूर्ण जनतेच्या हाती असते.”
3) <u>**प्रा डायसी**</u> – “लोकशाही हे शासनाचे असे रूप आहे की, ज्यात जनतेचा फार मोठा भाग शासन करतो.”
4) <u>**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**</u> – “लोकशाही हा असा प्रकार आहे की, ज्यात सामाजिक व आर्थिक परिवर्तन हे शांततामय व कायदेशीर मार्गाने होते”
5) <u>**महात्मा गांधी**</u> – “लोकशाही हा एक जीवनमार्ग आहे”
6) <u>**पंडित नेहरू**</u> – “लोकशाही म्हणजे केवळ मतदानाच्या हक्कासंबंधीची राजकीय समता नव्हे तर राजकीय समतेबरोबर आर्थिक व सामाजिक समता प्रस्थापित करणे होय.

वरील सर्व व्याख्येवरून असे दिसुन येते की लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये अंतिमसत्ता जनतेच्या हाती असते.

भारताने लोकशाही प्रणालीनुसार संसंदीय शासनव्यवस्थेचा स्विकार केला आहे. आपल्या देशात कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाकरिता केंद्रस्तरावर आणि राज्यस्तरावर निवडणूका होतात व लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी लोकशाही व्यवस्थेत शासनाचा कार्यभार चालवतात. भारतात कार्यकारीमंडळ कायद्याची अंमलबजावणी करते व न्यायमंडळ कायद्याचा अर्थ लावण्याचे कार्य करते. भारतामध्ये निवडणुकांच्या माध्येमातून जनता आपले प्रतिनिधी शासनात पाठवतात. भारतातील निवडणुका या तीनस्तरावर पार पडतात. केंद्रस्तर, राज्यस्तर व स्थानिक पातळीवर अनुक्रमे लोकसभा, विधानसभा व पंचायतराज व्यवस्थेमध्ये भारतीय जनता आपले लोकप्रतिनिधी निवडून देत शासकीय यंत्रणेत सहभागी होते. हे लोकप्रतिनिधी जनतेच्या वतीने राज्यकारभारामध्ये सहभागी होतात. लोकप्रतिनिधी निवडण्याचे काम मतदानाच्या हक्कांमधुन नागरिक करतात. मतदानाच्या माध्यमातून नागरिक शासनावर नियंत्रण ठेवतात. ठराविक वय पूर्ण केलेल्या (18 वर्ष) सर्व नागरिकांना भारतीय लोकशाहीत मतदानाचा हक्क प्राप्त झाला आहे. मुळ भारतीय संविधानामध्ये मतदानासाठी वयाची अट ही 21 वर्ष होती. परंतु, राजीव गांधी सरकारने ही अट 1988 मध्ये 61 व्या घटना दुरूस्तीनुसार 21 वरून 18 वर्ष एवढी केली.

लोकशाही सुदृढ, सक्षम आणि बळकट करायची असेल तर प्रत्येक 18 वर्ष पूर्ण केलेल्या व्यक्तीने मतदार म्हणून नोंद करून निवडणूकीत आपला हक्क बजावणे आवश्यक आहे. पण आजही अनेक ठिकाणी 'मतदार' हा अपेक्षेप्रमाणे मतदान करीत नाही. मतदान करणे टळतो अथवा अन्य कारणामूळे मतदानाचे प्रमाण कमी होते. या मागे मतदारांची उदासीनता कारणीभूत ठरते. यासाठी परभणी जिल्हा हेकार्यक्षेत्र निवडून मतदारांची उदासीनता याचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला जाणार आहे.

संशोधनाची आवश्यकता:-

लोकशाही शासनप्रणाली ही इतर शासनप्रणालीपेक्षा श्रेष्ठ दर्जाची शासनपध्दती आहे. लोकशाहीमध्ये जनताभिमुख राज्यकारभाराद्वारे कल्याणकारी राज्यांची निर्मिती केली जाते. सत्तेचे विकेंद्रीकरण केल्याने प्रत्येक नागरिकाला त्यांच्या योग्यतेप्रमाणे राज्यकारभारात भाग घेण्याची संधी प्राप्त होते. प्रत्येक नागरिकाला राजकीय ज्ञान प्राप्त होते. या सर्व कारणांमूळे लोकशाही व्यवस्था अधिकाधिक बळकट व मजबुत होणे आवश्यक आहे. लोकशाही व्यवस्थेत निवडणुककांच्या माध्यमातून जनता आपले प्रतिनिधी निवडते. म्हणून लोकशाही व्यवस्थेत निवडणुकांना विशेष महत्व प्राप्त होते. याच निवडणुका लोकशाहीमध्ये पुर्णत: मतदारांवर अवलंबुन असते. म्हणून प्रत्येक नागरिकाने मतदान करणे आवश्यक असते. पण अनेक ठिकाणी निवडणूक पार पडल्यानंतर निवडणुकीची टक्केवारी पाहिली असता. अनेक ठिकाणी कमी मतदान झाल्याचे दिसून येते. संविधान देशासाठी होवुन 72 वर्ष उलटून गेली तरी मतदाराचे अपेक्षित प्रमाण आपण गाठू शकलो नाही. अशाच प्रकारे कमी मतदान हे परभणी जिल्ह्यातही दिसून येते.

म्हणून परभणी जिल्ह्यातील मतदारांची राजकीय जागृती कशाप्रकारची आहे? मतदारांची राजकीय समस्या काय आहेत? मतदान न करण्यामागची भुमिका काय आहे? यासर्व प्रश्नांचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची आवश्यकता आहे.

समस्या सुत्रण:-

भारतीय शासनपध्दती ही लोकशाही शासनपध्दती असून लोकांनी लोकांचे लोकांसाठी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही होय लोकशाही शासन व्यवस्थेत जनता आपले शासन बनवते. जनता आपले लोकप्रतिनिधी निवचडणुकीद्वारे शासनात निवडते. म्हणून लोकशाही शासनव्यवस्थेत निवडणूक प्रणालीला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. अठरावर्षावरिल सर्व जनतेने निवडणुकीत सहभागी होऊन आपले प्रतिनिधी निवडून देणे अपेक्षित आहे. पण भारत देश स्वातंत्र्य होऊन 75 वर्षे आणि पहिल्या सार्वत्रिकी निवडणूकीस 70 वर्षे पूर्ण होत आहेत. तरीही देशाच्या अनेक भागात मतदान हे कमी प्रमाणात होत आहे. लोकशाही बळकट व सक्षम होण्यासाठी सर्व जनतेने पूर्ण ताकदीने, उत्स्फुर्तपणे मतदान करणे आवश्यक आहे. पण अनेक ठिकाणी मतदानाची टक्केवारी कमी प्रमाणात असलेली दिसून येते. महाराष्ट्रातील परभणी जिल्हा हा सुध्दा त्याला अपवाद दिसून येत नाही.

परभणी जिल्ह्यातील लोकसभा निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी पुढीलप्रमाणे दिसून येते.

लोकसभा निवडणूक	मतदानाची टक्केवारी	लोकसभा निवडणूक	मतदानाची टक्केवारी
1952	37.92%	1991	46.33%
1957	34.21%	1996	48.62%
1962	43.49%	1998	59.74%
1967	50.07%	1999	66.89%
1971	46.78%	2004	58.49%
1977	54.01%	2009	54.08%
1980	50.64%	2014	64.44%
1984	55.57%	2019	63.12%
1989	57.73%		

याच प्रमाणे मतदानाच्या टक्केवारीचे प्रमाण हे परभणी जिल्ह्यातील विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीतही दिसून येते. म्हणून या कमी मतदानाच्या टक्केवारीची कारणे कोणती आहेत.? मतदाराच्या समस्या कोणत्या आहेत? कमी मतदानाचे क्षेत्र कोणते आहेत? कमी मतदान होण्याऱ्या भागांची भैगोलिक परिस्थिती कोणती आहे? या सर्व प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी ***"परभणी जिल्ह्यातील मतदारांची उदासीनता: एक चिकित्सक अभ्यास "*** हा संशोधनाचा विषय निवडण्यात येत आहे.

संशोधनाची उदिष्ट्ये :-

1) परभणी जिल्ह्यातील लोकसभा विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांतील मतदानांचा अभ्यांस करणे
2) प्रत्येक निवडणुकी वेळी मतदानाच्या टक्केवारीत झालेला बदल जाणून घेणे.
3) निवडणुक आयोगाद्वारे मतदारांकरीता राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांचा अभ्यास करणे
4) कमी मतदान झालेल्या मतदार क्षेत्रांचा आढावा घेणे
5) कमी मतदान झालेल्या क्षेत्रातील मतदारांच्या समस्यांचा शोध घेणे
6) मतदारांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितींचा अभ्यास करणे
7) मतदाना वेळी निवडणूक आयोगाच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करणे

संशोधनाची गृहितकृत्ये:-

1) मतदारांमध्ये राजकीय जागृतीचा अभाव आहे.
2) व्यवसाय, व्यापार अथवा नोकरीच्या निमित्ताने अनेक मतदारांचे स्थलांतर झाले आहे.
3) मतदान न करणाऱ्यांमध्ये जास्त प्रमाण वयोवृध्दांचे आहे.
4) वृध्दत्व, शारिरीक आजारपण हे मतदानास अडथळे आहेत.
5) निरक्षरता हा कमी मतदानास कारणीभूत ठरणारा घटक आहे.

संशोधन पध्दती:-

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक व सर्वेक्षणात्मक पध्दतींचा वापर करण्यात येणार आहे. या संशोधनपध्दतींच्या सहाय्याने तथ्यांचा शोध घेण्यात येणार आहे आणि संकलित तथ्यांचे विश्लेषण आणि तुलना करण्यात येणार आहे. वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा मुख्य उद्देश एखाद्या समस्येशी संबंधित वास्तविक तथ्यांचा आढावा घेऊन विश्लेषण करणे हा होय.

संशोधनाची व्याप्ती:-

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे परभणी जिल्हा आहे. परभणी जिल्ह्यातील लोकसभा, विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीतील मतदानाच्या टक्केवारीचा अभ्यास करण्यात येणार आहे. परभणी जिल्ह्यात होणाऱ्या कमी मतदानाच्या प्रमाणाचे विश्लेषण करून मतदारांच्या समस्या शोधुन उदासीनतेचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाच्या मर्यादा:-

प्रस्तुत संशोधन विषयामध्ये निवडणूक व निवडणुकीत भाग न घेण्याऱ्या मतदारांच्या उदासीतनेचा अभ्यास करण्यात येणार आहे. परंतु निवडणुकीचा कार्यक्रम हा संपूर्ण देशभर व राज्यभरात होतो. यातील अनेक ठिकाणी मतदानाची टक्केवारी कमी दिसून येत असली तरी मात्र प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र हे केवळ परभणी जिल्ह्यापुरते मर्यादित असून सदरील संशोधनात केवळ मतदानात भाग न घेणाऱ्या मतदारांच्या उदासीनतेचा अभ्यास करण्यात येणार आहे.

नमुना निवड:-

प्रस्तुत संशोधन करत असताना विषयाची व्याप्ती तसेच अभ्यासासाठी प्रमाण मानलेली उदिष्ट्ये गृहितकृत्ये आणि वैशिष्ट्ये लक्षात घेता संपूर्ण समग्राचा अभ्यास न करता संशोधनासाठीच्या यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा अवलंब करून संशोधन कार्य पूर्ण करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन:-

प्रस्तुत संशोधन विषयासाठी तथ्य संकलन करताना सर्वसामान्य व्यक्ती व उत्तरदात्यांना विचारलेल्या प्रश्नांच्या प्रतिक्रिया नोंदी स्वरूपात असणार आहेत. हे लक्षात घेऊन प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने आवश्य असलेली माहिती संकलित करण्यासाठी प्रथमिक व दुय्यम तथ्य स्त्रोतांचा उपयोग केला जाणार आहे.

अ) **प्राथमिक साधने:-**

परभणी जिल्ह्यातील निवडणुकीची माहिती प्राप्त करताना निवडणूक आयोगाकडील कार्यालयीन प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे, अहवाल व संशोधन विषयाशी संबंधित व्यक्तीकडून व पदाधिकारी, मतदार यांच्याकडून प्रत्यक्ष मुलाखत व प्रश्नावलीच्या साह्याने तथ्य संकलन करण्यात येईल.

ब) **दुय्यम साधने:-**

प्राथमिक स्त्रोतांना अधिक पुष्टी देण्यासाठी दुय्यम स्त्रोतांचा आधार घेतला जाईल. त्यासाठी प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकाशित ,अप्रकाशित साहित्य, पुस्तके, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, नियतकालिके यासोबतच वेबसाईट या साधनांचा वापर केला जाईल.

संशोधन आराखडा:-

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील प्रमाणे प्रकरणांचे नियोजन करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले

प्रस्तावना,

सदरील प्रकरणात संशोधन विषयाची निवड, संशोधन पुर्वसाहित्याचा आढावा, संशोधनाची उदिष्ट्ये संशोधनाची गृहितके व संशोधन पध्दतीचा संशोधाची व्याप्ती आणि संशोधनाच्या मर्यादा यांचा समावेश करण्यात येईल.

प्रकरण दुसरे

परभणी जिल्ह्याची पार्श्वभूमी

संशोधनाच्या या प्रकरणात परभणी जिल्ह्याची ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक शैक्षणिक पार्श्वभूमीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे

परभणी जिल्ह्यातील निवडणुकांचा आढावा

संशोधनाच्या या तिसऱ्या प्रकरणात परभणी जिल्ह्यातील लोकसभा, विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांचा आढावा घेऊन मतदानाच्या टक्केवारीचा अभ्यास करण्यात येईल

प्रकरण चौथे

परभणी जिल्ह्यातील मतदानाची स्थिती व बदल

संशोधनाच्या प्रस्तुत प्रकरणामध्ये परभणी जिल्ह्यातील लोकसभा, विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीतील मतदारांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण पाचवे

परभणी जिल्ह्यातील कमी मतदानाची क्षेत्रे

संशोधनाच्या प्रस्तुत प्रकरणात परभणी जिल्ह्यातील कमी प्रमाणात होत असलेल्या मतदान क्षेत्राचा शोध घेऊन मतदान क्षेत्रांचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण सहावे

मतदारांची उदासिनता कारणे व त्यावरिल उपाय

संशोधनाच्या प्रस्तुत प्रकरणामध्ये कमी टक्केवारी असलेल्या मतदानक्षेत्रातील मतदारांचा सर्वेक्षण पध्दतीने आणि प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांच्या सहाय्याने समस्या जाणून घेण्यात येणार आहेत.

प्रकरण सातवे

सारांश व निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनाअंती येणारे निष्कर्ष व सारांश याची सविस्तरपणे मांडणी करण्यात येणार आहे.

संदर्भ सूची :-

1. चौधरी कि. का (संपा), **महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर परभणी जिल्हा**, महाराष्ट्र शासन 1988
2. भोळे भा.ल., **भारताचे शासन आणि राजकारण**, पायल प्रकाशन नागपूर,1974
3. डॉ बोधनकर सुधीर, **सामाजिक संशोधन पध्दती**, साईनाथ प्रकाशन नागपूर, 2003
4. प्रा. वि.ल. एरंडे, **भारतीय लोकशाही- अपेक्षा आणि वास्तव**, निर्मलप्रकाशन नांदेड – 2000
5. बी. बी. पाटील, **भारतीय शासन आणि राजकारण,** फडके प्रकाशन -2002
6. प्रा. सौ. अनघा फाटक**, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण,** मुरलीधर पब्लिकेशन 2001
7. डॉ. शांताराम भोगले**, राजकीय संकल्पना–सिध्दांत आणि संस्था,** विद्याभारती प्रकाशन 2000
8. प्रा.अ. ना. कुलकर्णी, **आधुनिक राजकीय विचार प्रणाली**, विद्याप्रकाशन नागपूर 2002
9. डॉ दिलीप खैरनार, **सामाजिक संशोधन पध्दती**, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद
10. करंडेकर अनिल शेषेराव**, महाराष्ट्र निवडणुका आणि निकाल** , बाबूकाका प्रकाशन नवीमुंबई 2000
11. कुंभार नागोराव, **लोकशाही: स्वरूप व समस्या**, प्रबोधन प्रकाशन लातूर, 2000
12. जावळे बी. जी., **लोकशाहीचे भवितव्य**, डोळस प्रकाशन , बीड 1988
13. फडके. य.दि., **लोकसभा निवडणूक 1952-1999**, अक्षर प्रकाशन मुंबई 1999
14. भोळे भा.ल., **भारतीय गणराज्याचे शासन व राजकारण,** पिंपळापुरे प्रकाशन नागपूर, 2003
15. विभुते भालबा**, निवडणूक मार्गदर्शक**, मनोविकास प्रकाशन मुंबई 2004
16. शिंदे. य.ग., **महाराष्ट्र विधानसभा निवडणूक**, चंदन प्रकाशन, पुणे 1999
17. सारथी आरूण , **भारतीय लोकशाही आणि आव्हाने**, रविराज प्रकाशन , पुणे 1998

मासिके

लोकराज्य मासिक

INDIA TODAY

वेबसाईट

www.eci.gov.in

https://ceo.Maharashtra.gov.in

https://mahasec.maharashtra.gov.in

संशोधक
पारडे राजु लिंबाजी
एम.ए . (राज्यशास्त्र)नेट

मार्गदर्शक
प्रा. डॉ. लोखंडे पी. एस
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
श्री. शिवाजी महाविद्यालय, परभणी